# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक
# घटक १ : प्रारंभिक सुधारक
# १) राजर्षी शाहू महाराज

**प्रास्ताविक**

राजाराम महाराजांचा फ्लोरेंस येथे अचानक मृत्यू झाला आणि चौथे शिवाजी महाराज कोल्हापूर गादीवर आले.इंग्रजांनी त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले तेथेच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी आनंदीबाई साहेबांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव व राधाबाई यांचा मुलगा यशवंतराव यांना दत्तक घेऊन त्यांचे नाव शाहू ठेवलेशाहू (यशवंत) यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला होता.

शाहूंच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. राजकोट येथे त्यांचे शिक्षण झाले पुढे धारवाड येथे त्यांनी शिक्षण घेतले त्यांनी इंग्रजी शिक्षण व राज्यकारभारातील शिक्षण घेतले. १८९१ मध्ये बडोदा येथील खानविलकर घराण्यातील लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. तर १८९४ मध्ये शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यांनी आपल्या राजपदाचा लोककल्याणासाठी उपयोग केला शाहू महाराजांचा १९२२ मध्ये मृत्यू झाला.

शाहू महाराज यांनी छत्रपती पदाची धुरा सांभाळल्या नंतर मृत्युपर्यंत (१९२२, २८ वर्ष) छत्रपती म्हणून लोककल्याणकारी कामे केली. हे करत असतानाच सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्याशी साह्यकारी भूमिका घेतली. महाराजांनी आपल्यास मिळालेले पद लोककल्याणार्थ उपयोगात आणले. पदाचे अधिकार व जबाबदारी आपल्याला मिळालेल्या वारसानुसार अत्यंत प्रभावी व लोकाभिमुख पद्धतीने वापरली. आपल्या लोककल्याणकारी व पुरोगामी विचारधारेमुळे शाहू महाराजांनी आपला एक वेगळा ठसा महाराष्ट्रीय व भारतीय इतिहासावर उमटविला आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीत त्यांचे मोलाचे योगदान आहे त्यांनी केलेले कार्य केवळ त्यांच्या संस्थानी प्रदेशापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्रभर, भारतभर त्यांचा प्रभाव पसरला. त्यामुळेच ते लोक राजा जाणता राजा कल्याणकारी राजा म्हणून राजर्षी शाहू महाराज सर्वपरिचित आहेत.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक राज्यकर्ते (संस्थाने) होऊन गेले. परंतु पारतंत्र्य काळातही आपल्या सत्तेचा उपयोग आपली प्रजा व भारतीय समाजाला नवी दिशा देण्यासाठी करणारे काही राज्यकर्ते होते. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण राज्यकर्ते करवीरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज होत त्यांचे केवळ कार्यच नव्हे तर विचारही अनुकरणीय व दिशादर्शक ठरले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे त्यांचा उल्लेख '**नवयुगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष** असा करतात. अलीकडच्या काळात करोना प्रदुर्भावाच्या पार्श्वभूमीवर समाज व राज्यकर्त्यांनी समस्यांना कसे सामोरे जावे याविषयी विविध पातळीवर चर्चा सुरु झाली. राजर्षी शाहू महाराज आचार विचारात सुसूत्रता असणारे, भविष्याचा वेध घेणारे व लोकमानसाची जाण असणारे राज्यकर्ते होते. त्यामुळे त्यांनी विविध विषयांच्या अनुषंगाने केलेले विचार व कार्य आजच्या काळातही अनुकरणीय व मार्गदर्शक आहेत.त्यामुळे त्यांच्या सुधारणा व विचारांचा अभ्यास आवश्यक ठरतो. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य पुढीलप्रमाणे ....

**१) महाराजांचे विचार**

महाराजांनी पुरोगामी विचारांचा पुरस्कार करत त्या विचारांना कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी समाजाचा विकास व बहुजन समाजाची मानसिकता बदलण्यासाठी शिक्षण आवश्यक मानले. सामाजिक समता त्यांना अपेक्षित होती. समाजातील कोणत्याच घटकावर अन्याय होऊ नये, समाजात न्यायाचे तत्त्व प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. संपूर्ण समाजाचा विकास व्हावा त्यांचे दारिद्र्य दूर व्हावे, समाजाचा शैक्षणि,क आर्थिक, कृषी, उद्योग या सर्वांगाने विकास व्हावा अशी त्यांची अपेक्षा व विचार होते त्यानुसार त्यांनी कार्य केले.

**२) शिक्षणविषयक कार्य**

समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. समाज उन्नती साठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून कार्य करणाऱ्या भारतीय सुधारकांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे अमुल्य योगदान आहे. शाहू महाराजांची शिक्षणविषयक दृष्टी मूलगामी होती व कायम स्वरूपाच्या सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग असल्याची त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांनी समाजाला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. क्षमता विकास करण्याची शिक्षणाची ताकद जाणून महाराजांनी आपल्या कार्यास अनुसरून अनेक संस्था व व्यवस्था (सुविधा) निर्माण केल्या. महाराजांचे कार्य विविधांगी असल्याने विविध प्रकारच्या संस्था त्यांनी उभारल्या व तशा संस्था उभारणीस अनुकुलता व मदत निर्माण केली.

**२.१) प्राथमिक शिक्षण**

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्राथमिक स्तरापासून शिक्षणाला प्राधान्य मिळावे म्हणून महाराजांनी प्राथमिक शिक्षण प्रसारावर भर दिला. प्राथमिक शिक्षण शिक्षण व्यवस्थेचा पाया असल्याने तो पाया भक्कम झाला पाहिजे म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात १९१३ मध्ये आदेश काढून प्रत्येक खेड्यात सार्वजनिक ठिकाणी प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

**२.२) सक्तीचे शिक्षण**

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही पण शिक्षणाचे महत्त्व ज्यांना कळत नाही अशा लोकांना शिक्षणाकडे वळविण्यासाठी त्यांना शिक्षणाची सक्ती केली. संस्थानात आदेश काढून सक्तीचे शिक्षण सुरू केले. पालकांनी मुलांना शाळेत पाठविणे सक्तीचे केले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांना दंड (महिन्याला एक रुपया) केला. त्यामुळे संस्थानात शाळा व विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली. पालकांवर सक्ती करण्याच्या प्रयोगामुळे शिक्षणाचा विकास होण्यास मदत झाली.

**२.३) विविध प्रकारच्या शाळा**

गरजेनुरूप शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी महाराज आग्रही होते. त्यांनी विविध प्रकारच्या शाळा सुरु केल्या. शिक्षणाचे महत्त्व व गरज ओळखून अनेक शाळा सुरु केल्या. पुरोहित शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा व कला शाळा त्यापैकीच आहेत.

**२.४) उच्च शिक्षण**

प्राथमिक शिक्षणा प्रमाणे महाराजांनी उच्च शिक्षणाला ही प्राधान्य दिले. तांत्रिक व लष्करी शिक्षण देणाऱ्या व्यावसायिक शिक्षणासही प्रयत्न केले. कोल्हापुरात राजाराम महाविद्यालयास महाराजांनी प्रचंड मदत केली. पुढे महाराजांनी हे महाविद्यालय या आर्य समाज या संस्थेकडे दिले. बहुजनांना उच्च शिक्षणाची संधी दिली. संस्थानातील शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न करताना संस्थानाबाहेरील शिक्षण संस्थांनाही त्यांनी मदत देऊ केली. राजाराम कॉलेज प्रमाणे उच्च शिक्षण देणाऱ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी, बनारस विद्यापीठ संस्थांना मोठी मदत दिली.

**२.५) व्यावसायिक शिक्षण**

शाहू महाराजांनी बहु जनांच्या व्यावसायिक शिक्षणाला ही प्राधान्य दिले ग्रामीण भागात सेवा करणाऱ्या लोकांना त्यांच्या व्यवसायाचे शिक्षण मिळावे याची त्यांनी व्यवस्था केली पाटील स्कूल तलाठी स्कूल यामार्फत प्रशासनाचे शिक्षण दिले तर जयसिंगराव घाडगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करून लोहारकाम गवंडीकाम सुतारकाम या सर्व स्थरातील शिक्षण दिले तर लष्करी शिक्षण देण्यासाठी इन्फंट्री स्कूल अशी व्यावसायिक शाळा काढली व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य दिले.

**२.६) स्त्री शिक्षण**

महाराजांनी समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्री शिक्षणास पाठबळ दिले. विवाहाचा खर्च शिष्यवृत्तीकडे म्हणजेच शिक्षणाकडे वळविला. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफ केली. ज्यामुळे स्त्री शिक्षणास चालना मिळेल. आपली सून इंदुमती विधवा

झाल्यावर तिला कोल्हापूर संस्थानच्या शिक्षण खात्याचे प्रमुख केले. रखमाबाई केळकर यांना शिक्षणाधिकारी केले. स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देऊन त्यांचा विकास कसा साधला जाईल यासाठी महाराजांनी प्रयत्न केले.

**२.७) शिक्षण सुधार समिती**

महाराजांनी शिक्षण सुधार समिती स्थापन केली त्यामाध्यमातून शिक्षण गरजा व समस्यांवर विचार केला. शिक्षणासाठी विविध मार्गांनी पैसा उभा केला. मंदिर उत्पन्नाचाही त्यासाठी उपयोग केला.

**२.८) वसतिगृहांची निर्मिती**

शाहू महाराजांच्या प्रयत्नांमुळे शिक्षणाचा विकास होत होता पण राहण्याखाण्याच्या गैरसोयीमुळे अनेकांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते ही समस्या दूर करण्यासाठी महाराजांनी वस्तीगृहाची निर्मिती केली प्रथम जाति जातिची वस्तीगृह निर्माण केली पण कालांतराने सामाजिक सलोखा निर्माण व्हावा म्हणून सर्वांसाठी समान वस्तीगृह निर्माण केली. उदा. व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह, दिगंबर जैन वसतिगृह, वीरशैव लिंगायत वसतिगृह, मुस्लीम वसतिगृह, मिस क्लार्क वसतिगृह, दैवज्ञ शिक्षण समाज वसतिगृह, श्री. नामदेव वसतिगृह, पांचाळ ब्राम्हण वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन वसतिगृह, ढोर-चांभार वसतिगृह, सुतार वसतिगृह नाभिक विद्यार्थी वसतिगृह, उदाजी मराठा वसतिगृह, वंजारी समाज वसतिगृह अशी अनेक वसतिगृह त्यांनी सुरु केली.

**२.९) देणगी व शिष्यवृत्ती**

शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्यंनी शिष्यवृत्तीही दिली. फक्त कोल्हापूर संस्थानात पुरतेच काम न करता महाराजांनी अनेक होतकरू तरुणांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. डेक्कन एज्युकेशन सोसायटी बनारस हिंदू विश्वविद्यालय या संस्थांना त्यांनी भरीव अर्थसाहाय्य केले तसेच महाराष्ट्रातील अनेक वसतिगृहांच्या स्थापनेमागे खूप मदत केली सर्वत्र शिक्षणाचा विकास व्हावा बहुजन समाजात अज्ञान शिक्षित व्हावा असाच त्यांचा प्रयत्न होता.

**३) सुधारणावादी समाजांचे कार्य व वेदोक्त प्रकरण**

आर्य समाज, प्रार्थना समाज, थिओसोफिकल सोसायटी यांचे विचार व कार्य महाराजांना प्रभावित करून गेले. महाराजांनीही या समाजांना त्यांच्या कार्यासाठी मदतीची भूमिका घेतली. महाराज पुरोगामी विचाराचे पुरस्कर्ते होते. अर्थात सर्व समाजाचे सर्वच विचार त्यांनी स्वीकारले असे नाही. त्यांना जे जे भावले ते ते स्वीकारले व पुरस्कारीले आहे. महाराजांच्या काळात सर्वाधिक चर्चिले गेलेले व गाजलेले प्रकरण म्हणजे वेदोक्त प्रकरण (१८९९) होय. या प्रकरणामुळे विविध पातळीवर विचार मंथन व जाणीव विकसित झाल्या. सत्यशोधक चळवळीस प्रेरणा मिळाली. कोल्हापुरातही सत्यशोधक समाजाची स्थापना (१९११) झाली होती. संस्थानात व सर्वत्र सत्यशोधक विचारांचा प्रसार अधिक जोमाने झाला. यात महाराजांचे योगदान महत्त्वाचे ठरले. म.फुले यांच्यानंतर सत्यशोधक समाजास पुनर्जीवीत करण्यात महाराजांचे योगदान मोठे आहे. कुठल्याही एका विशिष्ट वर्गाच्या जोखडात समाज अडकता कामा नये यासाठी सत्यशोधकी आग्रही होते. महाराजांचीही भूमिका तशीच होती. विशिष्ट प्रवृत्ती व त्यातून निर्माण शोषक व्यवस्थेविरोधात त्यांचा लढा होता. विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी त्यांनी विविधांगी प्रयत्न (क्षात्र जगद्गुरू) केले. १२ ऑक्टोबर १९२० रोजी शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरू संबंधीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या सगळ्याच्या मुळाशी असलेल्या वेदोक्त प्रकरणाबाबत गोवर्धन पारीख म्हणतात, "वेदोक्त महाराष्ट्र प्रकरणाने एका महान सामाजिक बंडखोरीला जन्म दिला आणि ती पर्यायाने महाराष्ट्राच्या सर्व सामाजिक जीवनाला वेगळे वळण देण्याला, इतिहासाला कलाटणी देण्याला समर्थ ठरली."

**४) वंचितांसाठी कार्य व अस्पृश्योद्धार**

महाराज समतावादी होते. आपल्या राजसत्तेचा महाराजांनी अस्पृश्योद्धारा साठीही पुरेपूर वापर केला. विषमता व त्याअनुकुल व्यवस्थांना त्यांनी विरोध केला.आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा बहु मोल वाटा आहे. राजश्री शाहू महाराज हे नुसते बोलके समाज सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृती करून आपल्या संस्थानाबरोबरच महाराष्ट्रात जनहिताच्या दृष्टीने अस्पृश्य समाजाला स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी अस्पृश्य समाज सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आंतरजातीय विवाह चालना दिली स्वतःची मुलीचाही आंतरजातीय विवाह घडवून आणला. धर्म महत्त्वाचा असला तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या आड तो येता कामा नये. म्हणूनच अस्पृश्य या शब्दासही महाराजांचा तीव्र विरोध होता. डॉ आंबेडकरांसह अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली त्यांच्या या व्यापक कार्यामुळे अस्पृश्यता नाहिशी होण्या साठी बरीच मदत झाली. अस्पृश्यांच्या माणगाव सह अनेक परिषदांना ते हजर राहिले. दिल्ली परिषदेतील भाषणातून त्यांची अस्पृश्योद्धारासाठी असलेली तळमळ व या प्रश्नाची जाण दिसते. राजर्षी महाराजांचे वंचितांसाठीचे कार्य पुढीलप्रमाणे

**४.१) अस्पृश्योद्धारसाठी शिक्षण**

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी आदेशाद्वारे प्रयत्न केले. कोल्हापुरात अस्पृश्य लोकांसाठी असलेली 'रात्रीची शाळा' २८ नोव्हेंबर १९०६ रोजीच्या आदेशाने कायम केली. तसेच ४ ऑक्टोबर १९०७ रोजीच्या आदेशान्वये कोल्हापुरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी दिली. महाराजांनी अस्पृश्य मुलांसाठी २७ शाळा, वस्ताद वस्तीगृह निर्माण केली. भास्करराव जाधव यांनी स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वस्तीगृह (१९०९) इमारतीसाठी जागा दिली.

**४.२) अस्पृश्यांना मोफत व एकत्रित शिक्षण**

२४ नोव्हेंबर १९११ रोजी महाराजांनी आदेश काढून संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत केले. तसेच हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ केली. १९२० मध्ये अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्ती सुरू केल्या. तत्पूर्वी १९१९ मध्ये संस्थानातील अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र शाळा बंद करून अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळांमध्ये इतर मुलांप्रमाणेच दाखल करून घेण्याचा आदेश दिला.

**४.३) वसतिगृह निर्मिती**

गरीब आर्थिक परिस्थितीमुळे मागास व कनिष्ठ समाजातील मुलांना माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहावे लागते म्हणून दलित मागास व कनिष्ठ समाजातील मुलांसाठी महाराजांनी १९०८ मध्ये 'मिस क्लार्क' हे वसतिगृह सुरू केले. मराठा, जैन, नाभिक अशा विविध जाती धर्माच्या मुलांसाठी कोल्हापूर या ठिकाणी वसतिगृहांची स्थापना करण्यात आली.

**४.४) अमानुष हजेरी पद्धती व वेठबिगारी बंद**

अस्पृश्यमुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ रोजी मंजूर होऊन ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिद्ध झाला. इंग्रजांनी गुन्हेगार शिक्का मारत काही जमातींसाठी सुरु केलेली हजेरी पद्धत या आदेशानुसार बंद केली. त्याचबरोबर बलुतेदारी ही पद्धत कायद्याने बंद करण्यात आली. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस १०० रुपये दंड व चार दिवसाची शिक्षा ही तरतूद करण्यात आली. मागास व कनिष्ठ ठरवलेल्या जातींमधील महार या जातीतील लोकांवरती वेठबिगारी ही अमानुष प्रथा लादण्यात आलेली

होती. या प्रथेनुसार पाटील व कुलकर्णी या सरकारी लोकांची कामे विना मोबदला करावी लागत असत. अशा प्रकारची गुलामगिरी नष्ट करण्याचे काम शाहू महाराजांनी केले

**४.५) आरक्षण व आर्थिक स्वावलंबन**

अस्पृश्यांसाठी संस्थानात पाच टक्के जागा राखीव ठेवल्या अस्पृश्यांना दरबारात व संस्थानात नोकऱ्या दिल्या अस्पृश्यांना बरोबर महाराज सहभोजन घेत होते तसेच गंगाराम कांबळे याला मध्यम वस्तीत हॉटेल काढून दिले ते स्वतः तेथे चहा घेत असत. त्यांच्या अनेक भाषणात त्यांनी स्वावलंबी होण्याची आवश्यकता प्रकर्षाने मांडली आहे. सामाजिक विषमतेच्या मुळाशी असलेले अर्थकारण महाराजांना चांगलेच ज्ञात होते त्यामुळे आर्थिकदृष्ट्या लोक स्वावलंबी होतील यासाठी विशेष प्रयत्न (उदा. शिवणयंत्रे वाटप) केले.

**५) स्त्री सुधारणा**

समाजातील विविध वंचित घटकांच्या जीवनात सुधारणा घडविण्यासाठी राजांनी कार्य केले. स्त्रीचे समाजातील महत्त्व व स्थान लक्षात घेऊन अनेक बदल राजांनी केले. त्यांचे कायदे स्त्री सुधारणा व बंधमुक्तीसाठी उपयुक्त ठरले. महाराजांनी स्त्रीच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यासाठी अनुकुलता निर्माण केली. स्त्रियांचा शिक्षण कल वाढविण्यास प्रयत्न केले. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना मोफत राहण्या- शिकण्याची सोय उपलब्ध करून दिली. स्वतःच्या सुनेसही (इंदुमती साहेब) शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. गुणवत्ता, पात्रता व कार्यक्षमतेनुसार स्त्रियांना अधिकार पदे दिली जात. स्त्री आहे म्हणून संधी नाकारली गेली नाही. कोल्हापुरातल्या कृष्णाबाई केळवकर यांना महाराजांनी वैद्यकीय अधिकारी नेमले त्या भारतातल्या पहिल्या स्री वैद्यकीय अधिकारी होत. इंग्रज प्रदेशातील कायद्यांपेक्षा अधिक पुरोगामी कायदे महाराजांनी आपल्या संस्थानात लागू केले होते. त्यामुळे स्त्री सुधारणांना मोठी गती मिळाली.

**५.१) सक्तीचे विवाह नोंदणी व संमती वयाचा कायदा**

महाराजांनी आपल्या संस्थानात कायद्याने विवाह नोंदणी सक्तीची केली होती. मुलीच्या विवाह वयविषयक कायदा केला. विवाहाच्या वेळी वराचे वय १८ वर्षे व वधूचे वय १४ वर्षे असले पाहिजे असे निश्चित केले. विशेष म्हणजे इंग्रजांच्या कायद्यानुसार मुलीचे वय १२ निश्चित केले होते. इंग्रजांच्या तुलनेत महाराजांचा कायदा अधिक पुरोगामी होता. त्याबरोबरच १८ वर्षे पूर्ण बयाच्या वधूस विवाहासाठी पालकांच्या संमतीची गरज नव्हती. स्त्रीला आपल्या जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या कायद्यानुसार देण्यात आले होते. प्रस्तुत कायदा म्हणजे स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे क्रांतिकारक पाऊल होते.

**५.२) विधवा पुनर्विवाह कायदा**

मागासलेल्या समाजामध्ये अनेक जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु काही समाजातील जातीत मात्र विधवांना पुनर्विवाह अधिकार नाकारण्यात आला होता. महाराजांनी हा अन्याय दूर केला. जुलै १९१७ कायदा करून विधवा विवाहास प्रोत्साहन देत अशा विवाहाला कायदेशीर मान्यता दिली. त्यामुळे विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीतील अडचणी दूर झाल्या.

**५.३) आंतरजातीय विवाह कायदा**

१२ जुलै १९१९ मध्ये आंतरजातीय विवाह कायदा करण्यात आला. त्यानुसार संस्थानातील लोकांना जातीनिर्बंध न पाळता विवाह करण्याची परवानगी देण्यात आली. या नवीन कायद्यानुसार झालेल्या

आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहू महाराजांनी एक खास विवाह नोंदणी अधिकारी नियुक्त केला होता.

**५.४) पडदा पद्धतीचा निषेध**

महाराष्ट्रातील उच्चवर्णीय विशेषता राजघराणे मराठा सरदार व वतनदार घराण्यात पडदा पद्धत होती. या पद्धतीमुळे स्त्रियांना पराक्रम, शूरपणा दाखवता येणार नाही, स्त्रियांमधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष होणार नाही असे महाराजांचे मत होते. त्यांनी या पद्धतीचा निषेध केला. स्त्रियांना देखील मुक्तपणे स्वाभाविकपणे जीवन जगण्याचा हक्क आहे आणि तो त्यांना मिळाला पाहिजे त्या तत्त्वाचा त्यांनी पुरस्कार केला होता.

**५.५) अत्याचार प्रतिबंधक कायदा**

अनेक स्त्रियांचा कुटुंबांकडून मोठ्याप्रमाणात छळ केला जात असे. अशा अपराधांना इंगज कायद्यात काही शिक्षा नव्हती. मात्र महाराजांनी स्त्रियांची अत्याचारापासून सोडवणूक करण्यासाठी २ ऑगस्ट १९१९ मध्ये एक सर्वसमावेशक कायदा मंजूर करून पुरुषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घातला. या कायद्यानुसार स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्याला सहा महिने कारावास व दोनशे रुपये दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आलेली होती.

**५.६) घटस्फोट व वारसा हक्क कायदा**

महाराजांनी आपल्या राज्यात घटस्फोटासंबंधीचा कायदा केला होता. स्त्रियांना त्यांच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर खर्चाची योग्य व्यवस्था कशी करता येईल, संतती असेल तर त्याची व्यवस्था अशा सर्व गोष्टींची दखल घेऊन घटस्फोटासंबंधीचा कायदा तयार करण्यात आलेला होता. या कायद्यातील महत्त्वाची तरतूद म्हणजे काही जातींमध्ये जात पंचायतीच्या आधारे घटस्फोट दिले जात होते. जात पंचायतीचे हे अधिकार काढून घेण्यात आले. तसेच जानेवारी १९२० मध्ये वारसा हक्काच्या कायद्यात महत्त्वपूर्ण बदल करून सर्व वर्ण व जातीच्या मुलांना वडिलांच्या मिळकतीत वारसा हक्क देण्यात आला. स्त्रियांच्या उद्धाराच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वपूर्ण ठरला

**५.७) देवदासी प्रथेविरोधात व जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा**

देवांच्या नावावर मुली सोडण्याच्या प्रथेतून देवदासी या वर्गाची निर्मिती होत होती. जोगतीन, मुरळी, भावीन असे अनेक प्रकार त्यामध्ये होते. देवदासी प्रथा ही एक स्त्रियांवरती अन्याय करणारी प्रथा होती. महाराजांनी १७ जानेवारी १९२० मध्ये कायदा करून आपल्या संस्थानातील देवदासीच्या प्रथेवर प्रतिबंध घातले. इतर स्त्रियांप्रमाणे देवदासी स्त्रियांना देखील अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**६) कृषी विकासाला चालना**

भारतीय समाजाचा आधार शेती आहे. शेतीवर केवळ उपजीविकाच चालते असे नव्हे तर लोकांच्या जीवन विचारालाही त्यातून दिशा मिळते. त्यामुळे शेतीचा विकास झाला, शेतकरी सुखी झाला तर राज्य सुखी, सधन, संपन्न होईल. असा त्यांचा विश्वास होता. शेतकऱ्यास विविध समस्या असतात त्या सोडविण्याची जबाबदारी घेणे व त्यासाठी आपले अधिकार वापरण्याची इच्छाशक्ती राज्यकर्त्याकडे असावी लागते. ती महाराजांकडे होती. शेतकऱ्यास त्याच्या समस्या सोडविण्यासाठी तात्कालिक मदत तर द्यायचीच परंतु समस्या पुन्हा निर्माणच होणार नाही यासाठीही प्रयत्न करण्याची दूरदर्शी भूमिका राजर्षींची होती. महाराजांनी सत्तेवर आल्यावर संस्थांनी प्रजेचा मुख्य आधार असलेल्या शेतीकडे विशेष लक्ष दिले.

शेती हा महाराष्ट्राचा प्रमुख व्यवसाय होता शेती पावसावर अवलंबून असलेल्या व सावकारी कर्ज तडकलेल्या शेतीला समृद्ध करण्याचा महाराजांनी प्रयत्न केला दुष्काळ निवारण करणे शेतकऱ्यांना साऱ्यात कर्जात सूट देणे शेतीला पाणीपुरवठा करणे परंपरागत वतनदारी नष्ट करणे या विविध उपाययोजना त्यांनी केल्या. महाराजांनी लागवड क्षेत्र वाढविण्यास प्रयत्न केले. पिक पद्धतीतही बदलास (कॉफी, चहा लागवड) चालना दिली. १९०८ मध्ये त्यांनी राधानगरी धरण बांधले. शेती विकासासाठी त्यांनी सिंचन समस्यांवर मात करण्यासाठी धरणाची (राधानगरी - १९०८) निर्मिती केली. विद्युत सुविधा निर्माण केल्या. विद्युत पुरवठा व सिंचनाच्या सुविधांमुळे त्यांच्या संस्थानात सुधारणा झाली. शेती तंत्रात आधुनिकीकरणासही प्रोत्साहन दिले. यंत्र शोध-निर्मितीस प्रोत्साहन दिले, त्यासाठी बक्षीस जाहीर केले. नव्या शोधांच्या (यंत्र) वापरास प्रोत्साहन दिले. किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट स्थापन केली. राजाराम कॉलेजमध्ये शेतीपूरक अभ्यासक्रम सुरु केला. कृषी प्रदर्शने आयोजित केली.शेतीसपूरक उद्योग व सहकार वाढीस हातभार लावला. शेती सुधारासाठी दुष्काळ निवारणाच्या अनुशंगाने विविध उपाय योजताना अनिष्ट परंपरा व व्यवस्था (वतनदारी व सावकारी) दूर करण्यासाठी प्रयत्न केले. शेतकी उत्पादनांना योग्य भाव मिळावा यासाठी प्रक्रिया उद्योगांना चालना दिली.

**७) व्यापार व उद्योग विकास**

महाराज कृषी औद्योगिक समाजाची पायाभरणी करत होते. औद्योगिक विकासाची आवश्यकता महाराजांना वाटत होती. अर्थात उद्योगांना चालना देताना त्यातील दोष, धोक्यांची जाणीवही त्यांना होती म्हणून संस्थानात समतोल औद्योगिक विकास होईल व उद्योग मालकी विशिष्ट गटाकडे केंद्रित होणार नाही याकडेही लक्ष दिले. सहकार वाढवा यासाठी प्रयत्न केले व त्याला अनुकुल धोरण स्वीकारले. संस्थानामध्ये 'सहकारी संस्थाविषयक कायदा (१९१२) केला. सहकार निबंधकांची नियुक्ती केली. शेतीबरोबरच व्यापार-उद्योगाच्या विकासाकडे महाराजांनी लक्ष दिले. महाराजांनी आपण व्यापार-उद्योगाकडे वळण्याची आवश्यकता वेळोवेळी मांडली. आपल्या विचारांना अनुसरून संस्थांनी उद्योगांसाठी संरक्षक धोरण स्वीकारले. गुळाचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे त्यासाठी महाराजांनी शाहू पुरी राजारामपुरी या दोन पेठा वसविल्या१९०६ मध्ये महाराजांनी शाहू छत्रपती जिनिंग आणि कापड गिरणी स्थापन केली जिनिंग फॅक्टरी फॅक्टरी निर्माण करून परिसरात उद्योग व्यवसायांना चालना दिली. संस्थांनी प्रदेशातील उत्पादन (शाई, कागद) वापरास प्राधान्य दिले. संस्थान मालकीचे लोहमार्ग उभारले. त्यामुळे शेतीसह उद्योग व्यापारास गती मिळून शेती व प्रजेचे हीत साध्य झाले.

**८) राजकीय चळवळ**

शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे आपल्या राजसत्तेचा उपयोग महाराजांनी लोकांच्या कल्याणासाठी केला. सत्ता व व्यवस्था यांची लोकांना जाण असावी व त्यात काम करणाऱ्यास तत्संबंधी ज्ञान असावे याबाबत महाराज आग्रही असल्याने त्यांनी गावकीचा कारभार चालविणाऱ्या पाटलाच्या शिक्षणासाठी पाटील शाळा सुरु केल्या. तलाठी शाळा सुरु केल्या. समाज राजकीय व्यवस्थेशी जोडला जाण्यासाठी डेक्कन रयत असोसिएशन (१९१६) सुरु केली. स्त्री सुधारणा करताना त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यावर त्यांनी भर दिला. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनास त्यांनी कृष्णाबाई व द्वारकाबाई केळवकर यांना पाठविले होते.

**९) आपत्तीत मदत**

महाराजांना राज्यकर्ता म्हणून आपल्या कार्यकाळात अनेकदा नैसर्गिक आपत्तीचाही सामना करावा लागला. महाराज गादीवर आले त्यानंतर अल्पावधीत दुष्काळ (१८९६) व प्लेगची साथ या संकटाचा सामना करावा लागला. दुष्काळी भागाची पाहणी अधिकाऱ्यांमार्फत तर केलीच पण स्वत:ही दुष्काळी भागाचा दौरा केला. स्वतंत्र दुष्काळ विभाग सुरु केला. दुष्काळात सारा वसुलीत सवलती दिल्या. अनेक दुष्काळी कामे सुरु केली ती करताना रोजगार निर्मिती व लोकोपयोगी कामे यांचा मेळ घातला. लोकांसाठी अनेक सुविधा (स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रम) निर्माण केल्या. उपासमारीने माणूस व प्राणी जाऊ नये यासाठी सरकारने खर्च

करत व्यवस्था (स्वस्त धान्य दुकान, सामुदायिक गोठे) केली. जवळपास ७५ हजार रुपयांचे कर्ज अल्पव्याजदरात उपलब्ध करून दिले.दुष्काळाबरोबर प्लेगची साथही पसरत होती. महाराजांनी प्लेग आयुक्ताची नियुक्ती केली. प्लेगबाबत लोकांना माहिती (शास्त्रीय) देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी पत्रके, व्याख्याने असे अनेक मार्ग वापरले. नियमावली जाहीर केली. स्वच्छता व काळजी याबाबत जागृती केली. धारीष्ट्याने यात्रांवर निर्बंध घातले. विलगीकरण कक्ष उभारले. प्लेगवर होमिओपॅथी उपचारपद्धती प्रभावी असल्याने कोल्हापुरात पहिला सार्वजनिक होमिओपॅथीचा दवाखाना (१८९८) सुरु केला. पुन्हा अशा समस्या निर्माण झाल्यास त्यास तोंड देण्याची व्यवस्था तयार ठेवली. प्रतिकूल काळात महागाई वाढणार नाही याची काळजी घेतली. डॉ.शिखरे म्हणतात, "दुष्काळ व प्लेगच्या आजारावर मात करण्यासाठी शास्त्रशुध्द नियोजन, कार्यक्षम प्रशासन निर्माण केले. भीती आणि अनिश्चिततेच सावट घेऊन आलेल्या दुष्काळ व प्लेगच्या महामारीत महाराजांनी रयतेला दिलासा देण्याचे महत्कार्य केले."

**१०) कलावंतांचे आश्रयदाते महाराज**

महाराज कलाप्रेमी होते. राजर्षी शाहू महाराज यांनी चित्रपट, लोककला, कुस्ती अशा विविध क्षेत्रातील लोकांना आश्रय देत प्रोत्साहन दिले. साहित्य, संगीताची त्यांना विशेष जाण व आवड होती. विविध कलावंतांप्रमाणे शाहिरांनाही त्यांनी उदार आश्रय दिला व प्रसंगानुसार त्यांचा गौरव केला. लहरी हैदरसाहेब (कलगीवाले), जंगली मुजावर, शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, रामचंद्र नरहर (कलगी शिरपेचवाले, आबा माळी (तुरेवाले), शाहीर भाऊ पाटोळे (भिलवडीकर), शाहीर रामचंद्र दळवी, शाहीर पठ्ठे बापूराव (रेठरेकर), शाहीर मारुती सकटे अशा अनेक शाहिरांना महाराजांचा उदार आश्रय लाभला होता. अशा अनेक शाहिरांना त्यांनी गौरविले आहे. संगीतविषयक सहाशे पेक्षा जास्त कलावंत महाराजंच्या आश्रयास होते. देशातील पहिली संगीतविषयक संस्था (कोल्हापूर गायन समाज, १८८३) महाराजांच्याच पाठबळाने स्थापन झाली. त्यामुळे विविध कलांचा विकास झाला. सांस्कृतिक विकास साधत असतानाच काळाची व प्रजेची गरज ओळखून विविध क्षेत्रात नवे नवे प्रयोग करत विकास घडवून आणला. त्यांनी त्यांच्या संस्थान प्रदेशात राबविलेल्या अनेक योजना सर्वत्र अनुकरणीय ठरल्या.

**समारोप**

राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा भारतीयांच्या विचार व आचारावर मोठा प्रभाव पडला. त्यांच्या या प्रभावी कार्यामुळेच आजही जनमानसात त्यांचा पगडा असलेला दिसतो. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो. कुर्मी समाजाने (कानपूर) महाराजांना राजर्षी म्हणून गौरविले आहे.

राजर्षी शाहू महाराज राज्यकर्ते होते. आपली सत्ता लोककल्याणासाठी उपयोगात आणण्याची त्यांची भूमिका होती. तत्कालीन लोकमानसाची त्यांना उत्तम जाण होती. म्हणूनच त्यांनी आपली दंडशक्ती फार प्रभावीपणे वापरली. प्रसंगी गरजेचे महत्त्व समजून घेत धाडसी निर्णय घेतले. समस्या सोडविताना भविष्यात त्या पुन्हा निर्माण होणार नाहीत व झाल्याच तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागणार नाही यासाठी व्यवस्था त्यांनी विकसित केल्या. निर्णय करताना, व्यवस्था उभारताना सामान्य माणूस त्यांच्या डोळ्यासमोर होता. तत्कालीन व भविष्यातील जगाच्या बरोबरीने आपली प्रजा कशी जाईल यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांच्या आचार विचारात कमालीचे एकत्व होते. जे विचार त्यांनी मांडले ते त्यांनी आचरणातही आणले. सर्व अनिष्ट व्यवस्थांच्या, मर्यादांच्या पलीकडे जाऊन भविष्यकालीन गरजा ओळखून कार्य करणारे राज्यकर्ते राजर्षी शाहू महाराज होते. आजही अनेक प्रसंगात महाराजांची विचार व निर्णय पद्धती आदर्श व उपयुक्त तसेच काळशी सुसंगत दिसते.